# कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
(म्हाडाचा घटक)

# KONKAN HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD
(A MHADA UNIT)

म्हाडा MHADA

जा.क्र.उपमुअ/कों.मं./ ६१।२ /२०२२
दिनांक 23/09/2022

प्रति,
सर्व १९७ लाभार्थी (संकेत२७६ मधील १२५ व जुने ७२)
इमारत क्र.१बाळकुम, ठाणे

विषय :- सर्व्हे क्र. ६३ पै मौज -ढोकाळी २७६ बाळकुम ठाणे (प) मधील १९७ लाभाधारकांना वित्तीय संस्थेमध्ये ९०% कर्ज घेण्याचे ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत.

सन २०१८ मध्ये बाळकुम ठाणे या इमारीतीची लॉटरी काढण्यात आली असून सदर लाभार्थ्यांना दि. ०७/०९/२०२२ रोजी देकारपत्राचे वितरण करण्यात आले आहे सदरहू वितरणपत्रामध्ये अटीशर्तीच्या अधिन राहून सदर लाभार्थ्यांना भरावयाची रक्कम तीन टप्यामध्ये भरण्याचे बंधनकारक आहे असे कळविण्यात आले होते. सदर टप्पे खालीलप्रमाणे ठरविण्यात आले आहे.

| टप्पा | भरावयाची रक्कम | मुदत |
|---|---|---|
| १. | सदनिकेच्या एकुण किंमतीच्या २५ % रक्कम | दि.३१/१०/२०२२ पर्यंत रक्कम भरणे बंधनकारक आहे. |
| २. | दुसरा टप्पा ५०% रक्कम | दि.३१/०१/२०२३ पर्यंत रक्कम भरणे बंधनकारक आहे. |
| ३. | उर्वरित २५% रक्कम | भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतर ३० दिवसांत भरणे बंधनकारक आहे. |

सदर योजनेतील लाभार्थी यांनी कार्यालयात येऊन प्रथम टप्प्यातील २५% न भरता १०% रक्कम भरुन उर्वरित ९०% रक्कम बँकेतुन कर्ज काढुन भरण्यास आम्ही तयार असल्याने सदनिकेच्या विक्री किंमतीच्या १०% रक्कम स्विकारुन गृहकर्ज NOC मिळावी अशी कार्यालयात येवून मागणी करीत आहेत.

सदर मागणीचा विचार करता लाभार्थी यांना सदनिकेच्या विक्री किंमतीचा भरणा सुलभ व मुदतीत होणेसाठी व मंडळाचा महसुल लवकरात लवकर प्राप्त करुन घेणेसाठी मौजे बाळकुम ठाणे, संकेत क्र. २७६ मधील सर्व विजेते व देकार पत्र प्राप्त विजेत्यांकडून सदनिकेची १०% म्हणजे ५,९७,४८०/- रु. चा भरणा केल्यानंतर कोंकण मंडळामार्फत ९०% रक्कम बँकेकडून किंवा वित्तीय संस्थेकडून गृहकर्ज स्वरुपात उपलब्ध होणेसाठी **"नाहरकत प्रमाणपत्र"** देण्यात येईल. तरी सर्व **लाभार्थी** यांनी१०% रक्कम भरुन गृहकर्जासाठी कोंकण मंडळकडे अर्ज दाखल करावेत.

(मा.मुख्य अधिकारी/ कों.मं. यांच्या मान्यतेने)

(कल्पना पवार)
उपमुख्य अधिकारी
कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
मुंबई

पोटमाळा, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१
दूरध्वनी : ०२२ - ६६४०५०१७ • ई-मेल : konkanmhada2008@gmail.com

Mezzanine Floor, Grihnirman Bhavan, Bandra (E), Mumbai - 400051.
Contact : 022-66405017 • E-mail : konkanmhada2008@gmail.com